**ठळक बातम्या**

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान सुरु/ सकाळी ११ वाजेपर्यंत २७ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान

- राज्यातल्या अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम लवकरच जाईल, असं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- इक्षक टेहेळणी जहाज आजपासून भारतीय नौदलाच्या सेवेत

- ऑस्ट्रेलिया-भारत टीट्वेंटी क्रिकेट सामन्यात नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**आणि**

- इजिप्तमध्ये आजपासून सुरू होणाऱ्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत मनू भाकरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सहभागी होणार

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाला आज सात वाजता सुरुवात झाली. १८ जिल्ह्यात मिळून १२१ मतदारसंघामध्ये १ हजार ३१४ उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होईल. सकाळी ११ वाजेपर्यंत २७ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान झालं . सर्वात जास्त मतदानाची नोंद बेगुसरायमधे ३० पूर्णांक ३७ शतांश टक्के इतकी झाली. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून,

**व्हॉईस कास्ट-**

*(बिहार विधानसभेसाठी आज पहिल्या टप्प्याचं मतदान १२१ जागांवर होत असून बिहारची राजधानी पाटणा, वैशाली, नालंदा, भोजपूर, मुंगेर, सारण, सिवान, बेगुसराय, लखीसराय, गोपाळगंज, मुझफ्फरपूर, दरभंगा, मधेपुरा आणि सहरसा या मतदारसंघांचा त्यात समावेश आहे. सुरक्षेच्या कारणास्तव*

*सिमरी बख्तियारपूर, महिषी, तारापूर, मुंगेर, जमालपूर आणि सूर्यगढ विधानसभा मतदारसंघातल्या ५६ मतदान केंद्रांवर संध्याकाळी पाच वाजेपर्यंतच मतदान होणार आहे. मतदान शांत, मुक्त आणि निःपक्षपाती वातावरणात पार पडण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. सर्व ४५ हजार ३४१ मतदान केंद्रांवरून वेबकास्टिंग केले जाईल. पाटणा इथल्या निवडणूक कार्यालयामध्ये एक विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मतदानादरम्यान अनुचित प्रकार घडल्याचं वृत्त नाही. बिहारचे मुख्यमंत्री नीतीशकुमार, यांनी बख्तियारपूर इथं, तर उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मुंगेर इथं मतदान केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांनी उत्साहाने मतदान करावं असं आवाहन केलं असून, पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या युवा मतदारांना शुभेच्छा दिल्या आहेत.)*

दरम्यान बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराने वेग घेतला आहे. दोन्ही टप्प्यांची मतमोजणी येत्या १४ नोव्हेंबरला होणार आहे. दरम्यान बिहार निवडणुकीची प्रक्रीया पाहण्यासाठी ७ वेगवेगळ्या देशातल्या १६ प्रतिनिधींनी निवडणूक सज्जतेची पाहणी केली.

**<><><><>**

राज्यातल्या काही अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांपर्यंत अद्यापही नुकसान भरपाईची मदत पोहोचली नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे, मात्र ही मदत येत्या काळात शेतकऱ्यांच्या खात्यात जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. आज नागपूर इथं पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले,

**बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यासंबंधी बोलताना फडणवीस यांनी, निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन हा दौरा असल्याची टीका केली.

**<><><><>**

पुण्यात कोरेगाव पार्क इथल्या कथित जमीन गैरव्यवहारप्रकरणी महसूल विभाग, आयजीआर, जमीन नोंदणी दस्तऐवजाची माहिती मागवली असून चौकशीचे आदेश दिल्याचं त्यांनी वार्ताहरांना सांगितलं. प्रथमदर्शनी जे मुद्दे समोर आहेत ते गंभीर आहेत, ही माहिती आणि प्राथमिक चौकशीच्या आधारे पुढचा निर्णय घेतला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. पार्थ पवार यांच्या अमीडीया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीने अठराशे कोटी रुपये किमतीची जमीन केवळ तीनशे कोटी रुपयांना घेतली. सरकारी जमीन कशी खरेदी केली असा प्रश्न विचारत या व्यवहारात घोटाळा

झाल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेत विजय वडेट्टीवार यांनी केला. ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांशी संवाद साधला. मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे, जमीन खरडून गेली आहे, रस्ते वाहून गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळायला हवी असं ठाकरे म्हणाले. शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असं आश्वासन देऊन महायुती सत्तेवर आली, मात्र दिलेलं आश्वासन पाळलं नाही, अशी टीका ठाकरे यांनी यावेळी केली.

**होल्ड बाईट ठाकरे**

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सोलापूर शहर अध्यक्ष सुधीर खरटमल यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली असून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधे प्रवेश केला आहे. खरटमल यांनी आजच राजीनामा प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे दिला असून मुंबईत  पक्षाचे नेते अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि इतर नेत्यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला.

**<><><><><>**

वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्घाटन उद्या दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं याचं आयोजन करण्यात येणार असून, स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणारं हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी दीडशे वर्षांपूर्वी लिहीलं होतं. देशभरात या निमित्त वर्षभर विविध कार्यक्रम होणार आहेत. उद्याच्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन होणार आहे.

**<><><><><>**

भारतीय नौदलाच्या जलक्षेत्र सर्वेक्षणाची क्षमता वृद्धिंगत करणारं इक्षक टेहेळणी जहाज आजपासून औपचारिकरित्या नौदलाच्या सेवेत दाखल होत आहे. नौदल प्रमुख अँडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत हा समारंभ होणार आहे. इक्षक दक्षिण नौदल कमांड अंतर्गत तैनात होत असून त्याचा बहुतांश भाग देशांतर्गत उत्पादन सामुग्रीतून तयार झाला आहे. जहाजं, बंदरे आणि जलमार्ग, किनारपट्टी आणि खोल समुद्रातल्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी या जहाजाची निर्मिती केली आहे.

**<><><><><>**

नेरळ-माथेरान दरम्यान धावणारी प्रसिद्ध ‘टॉय ट्रेन’ आजपासून पुन्हा सुरू झाली आहे. जून महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या अतिवृष्टीमुळे ही ट्रेन बंद करण्यात आली होती. रोज सकाळी ८वाजून ५० मिनिटांनी आणि १० वाजून २५ मिनिटांनी ही ट्रेन नेरळहून निघेल तर माथेरानहून रोज दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी आणि संध्याकाळी चार वाजता नेरळकरता रवाना होईल. सहा डब्यांच्या या ट्रेन मध्ये तीन डबे द्वितीय श्रेणीचे तर ,दोन साधारण श्रेणीचे डबे असतील. पहिल्या ट्रेनमध्ये विस्टाडोम कोच असेल, तर दुसऱ्या ट्रेनमध्ये फर्स्ट क्लास कोच असणार आहे. १९०७ मध्ये सुरू झालेली नेरळ– माथेरान लाइट रेल्वे यंदा ११८ वं वर्ष साजरं करत आहे.

**<><><><><>**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक - २०२५ च्या विजेत्या भारतीय महिला संघानं इतिहास रचला असून या सर्व महिला तरुण पिढीसाठी आदर्श आहेत, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संघातल्या महिला खेळाडूंबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. विजेत्या महिला संघानं राष्ट्रपती भवन इथं राष्ट्रपतींची भेट घेतली त्यानंतर मुर्मू यांनी समाज माध्यमांवर महिला खेळाडूंचं कौतुक केलं.

विश्वचषक विजेत्या महिला क्रिकेट संघातल्या खेळाडूंनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. या खेळाडूंनी ‘फिट इंडियाचा’ संदेश सर्वत्र पोहोचवावा, तसंच तंदुरुस्त राहण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करावं, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

<><><><><>

भारत-ऑस्ट्रेलिया टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज ऑस्ट्रेलियात कॅररा इथं सुरु आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

भारताच्या सलामीच्या जोडीनं आक्रमक सुरुवात करत धावगती ८ च्या वर नेली. ७ व्या षटकात संघाची धावसंख्या ५६ असताना अभिषेक शर्मा वैयक्तिक २८ धावांवर बाद झाला. मात्र यामुळे दबावाखाली न येता शुभमन गिल आणि शिवम दुबे यांनी फटकेबाजी करत धावगती चांगली राखली. शिवम दुबे २२ धावा करुन बाद झाला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १६व्या षटकात ४ बाद १२५ धावा झाल्या होत्या.

पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकत मालिकेत बरोबरी साधली आहे.

<><><><><>

इजिप्तमध्ये आजपासून सुरू होणाऱ्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत मनू भाकरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सामील होणार आहे. पिस्तुल प्रकारात मनू भाकर, ईशा सिंग आणि सुरूची सिंग देशाचं प्रतिनिधित्व करतील. रायफल नेमबाजीत, रुद्रांक्ष पाटील, स्वप्नील कुसळे सहभागी होतील, अनुभवी नेमबाज एलाव्हेनिल वलारिवन, सिफ्ट कौर समरा, अर्जुन बाबुता, अनिश

भानवाला आणि ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर यांचाही भारतीय चमूत सहभाग आहे. स्पर्धेत ७२ देशांतील ७२० नेमबाज सहभागी होतील.

//<><><><><>//